# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१.

E-mail: research2@barti.in Web: https://barti.maharashtra.gov.in


बार्टीमार्फत दि. ०७ एप्रिल २०१७ ते १४ एप्रिल २०१७ या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती निमित्त समता सप्ताह साजरा केला जाणार आहे. त्या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

**अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जातीव्यवस्थेचे निर्मूलन या पुस्तकातील आशयावर आधारित राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'Annihilation of Caste' (जातीव्यवस्थेचे निर्मुलन) या पुस्तकातील आशयावर आधारित 'एकांकिका स्पर्धा' आयोजित केली आहे.

**स्पर्धेच्या नियम व अटी :-**

१. स्पर्धकांसाठी सादरीकरणाच्या वेळेचा किमान कालावधी २५ ते ३० मिनिटे असणार आहे. सदर एकांकिका स्पर्धेत भाग घेवू इच्छिणाऱ्यांनी दि. १२ मे २०१७ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत आपले नाव, संपूर्ण पत्ता, वय, मोबाईल नं., इमेल आय.डी. व आपल्या एकांकिका सादरीकरण स्पर्धेत भाग घेणेबाबतच्या अर्जासह थोडक्यात संकल्पना व स्क्रीप्ट वरील पत्त्यावर पाठवावेत. निवड झालेल्या टीम स्पर्धकांना प्रत्यक्ष एकांकिका सादरीकरणासाठी बोलाविले जाईल.

२. टीम म्हणून निवड झालेल्या प्रथम तीन उत्तम एकांकिकेस सन्मानचिन्ह, रोख पारितोषिक रक्कम: प्रथम क्र. रु. २०,०००, द्वितीय क्र. रु. १५,०००, तृतीय क्र. रु. १०,००० व सन्मानचिन्ह दिले जाईल. सादरीकरणानंतर निवड झालेल्या पहिल्या तीन विजेत्या टीम वगळता उर्वरित ७ टीमला प्रत्येकी रु. ३,००० रक्कम सहाय्य म्हणून दिली जाईल.

**ब) सामाजिक सलोख्याची वस्तुस्थिती व आव्हाने यावर आधारित माहितीपट तयार करणे:** समाजामध्ये जातीय दुर्भावनांचा विध्वंस व जातीय दुर्भावना निर्माण करणाऱ्या तत्वांचे उच्चाटन होऊन सामाजिक सलोखा व बंधुभाव प्रस्थापित होणे नितांत आवश्यक आहे. त्यासाठी 'सामाजिक सलोख्याची वस्तुस्थिती व आव्हाने' याविषयी माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याकरिता माहितीपट निर्मिती करणे विचाराधीन आहे. त्याकरिता माहितीपट निर्मिती करण्यासाठी इच्छुकांकडून (Request for Proposal) अर्ज (अंदाजित खर्चासहित) मागविण्यात येत आहेत. त्यामध्ये माहिती संकल्पना, आपली कल्पना व माहितीपटाबाबत थोडक्यात तपशील इ. देण्यात यावा. इच्छुकाने आपले नाव, पत्ता, इमेल आयडी, मोबाईल, इतर सविस्तर माहिती व दस्तावेज इ. सहित वरील पत्त्यावर पाठवावे. अर्ज पाठविण्याची अंतिम मुदत दि. २९ एप्रिल २०१७ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत असेल.

वरील सर्व बाबतीत निर्णय घेण्याचे व त्यात बदल करण्याचे किंवा त्या रद्द करण्याचे अंतिम अधिकार महासंचालक, बार्टी यांचेकडे असतील.

**राजेश ढाबरे, भारासे**

महासंचालक, बार्टी

**Advt/Research2/12/04/2017/57**